बृहन्मुंबई महानगरपालिका

सहाय्यक आयुक्त ए विभाग

क्र.सहा.आ/ए/ ०२३१३ / इन / परिरक्षण, दिनांक: १९ / ११/२०२६

स्थळदरपत्रिका

'ए' विभागामध्ये दिनांक २२.११.२०२६ रोजी 'WNC Navy Half Marathon – 2026' या राष्ट्रीय दर्जाच्या मॅरेथॉन स्पर्धा आयोजनाच्या अनुषंगाने स्पर्धेच्या मार्गिकेवर प्रमुख ठिकाणी रस्त्यांवर थर्मोप्लास्टिक रंगाने रंगविणे, रस्ते दुभाजक रंगकाम, सौंदर्यीकरण, फेन्सिंग इत्यादी कामे तातडीने करणे करीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रस्तावित मॅरेथॉन स्पर्धा ही भारतीय नौदलाचा कार्यक्रम असल्यामुळे तसेच नफा-रहित, अव्यावसायिक आणि कल्याणकारी उपक्रम असल्याने, सदर स्पर्धेच्या अनुषंगाने 'ए' विभागातील मॅरेथॉन स्पर्धेच्या मार्गिकेवर प्रमुख ठिकाणी वरील कामे तातडीने करण्याबाबत या विभागास मौखिक आदेश दिलेले आहेत.

त्यास असुनरुन 'ए' विभागातील दिनांक २२.११.२०२६ रोजी नियोजित 'WNC Navy Half Marathon – 2026' या राष्ट्रीय दर्जाच्या मॅरेथॉन स्पर्धेच्या अनुषंगाने खालील तक्त्यात नमूद तातडीने पार पाडावयाची कामे तत्सम कामांचा अनुभव असलेल्या कंत्राटदाराकडून स्थळदरपत्रिका पात्रता निकषानुसार मागविण्यात येत आहे.

अनु क्र.	कामाचे ठिकाण व स्वरुप	अंदाजित रक्कम
१	'ए' विभागातील हुतात्मा चौक येथे थर्मोप्लास्टिक रंगाने डायमंड क्रॉसिंग पट्टे आखणे.	२३९३०४.००
२	'ए' विभागातील हुतात्मा चौक येथे थर्मोप्लास्टिक रंगाने रोड मार्किंग व झेब्रा क्रॉसिंग पट्टे आखणे.	२३८३६०.००
३	'ए' विभागातील वीर नरिमन रोड व महात्मा गांधी मार्ग येथे थर्मोप्लास्टिक रंगाने डायमंड क्रॉसिंग पट्टे आखणे.	२३९०६८.००
४	'ए' विभागातील छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्थानक जंक्शन येथे थर्मोप्लास्टिक रंगाने डायमंड क्रॉसिंग पट्टे आखणे.	२३९३०४.००
५	'ए' विभागातील वालचंद हिराचंद मार्ग व सीएसएमटी जंक्शन येथे थर्मोप्लास्टिक रंगाने झेब्रा क्रॉसिंग पट्टे आखणे.	२३६९४४.००
६	'ए' विभागातील शहीद भगत सिंग मार्ग व रिगल जंक्शन येथे थर्मोप्लास्टिक रंगाने रोड मार्किंग पट्टे आखणे.	२३८८३२.००
७	'ए' विभागातील शामा प्रसाद मुखर्जी चौक जंक्शन येथे थर्मोप्लास्टिक रंगाने रोडा क्रॉसिंग व झेब्रा क्रॉसिंग पट्टे आखणे.	२३७८८८.००
	एकूण	**रु.१६,६९,७००/-**

पात्रता व निकष:-

१. बृहन्मुंबई महानगरपालिका नोंदणीकृत कंत्राटदार असणे आवश्यक.

२. समान कामाचा अनुभव असणे आवश्यक.

सबंधित कंत्राटदाराने उपरोक्त पात्रता व निकषाच्या आधारे सहा.आयुक्त 'ए' विभाग यांचे कार्यालय, १३४-ई, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१ या ठिकाणी स्थळदरपत्रिका भरण्याची कालावधी (दिनांक १९.११.२०२६ – सायं. ०६:०० ते दिनांक २०.११.२०२६ – सायं. ०६:०० पर्यंत व त्याच दिवशी, दिनांक २०.११.२०२६ रोजी सायं. ०६:०० वाजता प्राप्त मोहोरबंद स्थळदरपत्रिका उघडण्यात येतील.)

सही/-

सहाय्यक आयुक्त 'ए' विभाग